10th Pune International Film Festival 2012

१७ जानेवारी २०१२

# अझरबझानमधील ' सहा ' चित्रपट पुणे महोत्सवात

सोव्हियत युनियनचे विघटन झाल्यावर तयार झालेल्या अझरबझान या छोट्या देशातील दिग्दर्शक इल्गार सकात यांनी दिग्दर्शित केलेल्या सहा चित्रपटाने पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात रसिकांना अंतर्मुख केले.

या देशातही दरसाल हातांच्या बोटावर मोजण्याइतके चित्रपट तयार होतात. अजूनही सरकारकडून फारशी मदत होत नाही. वीस वर्षांपूर्वी सोव्हियत युनियन एकत्र असताना या छोट्या प्रांतातील लोकांना चित्रपट क्षेत्रात काम करणे शक्य नव्हते. आता अनेक तरुण चित्रपट क्षेत्रात येत आहेत.

आयुष्यातील पूर्वीच्या घटनांचा हळूहळू विसर पडत जाणाऱ्या व्यक्तींची कथा या चित्रपटात त्यांनी मांडली आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने अझरबझान देशातील सुमारे दोनशे वर्षापूर्वीचा सांस्कृतिक वारसा लोकांपुढे आणण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले. चित्रपटात मानसशास्त्रावर खास भर देण्यात आल्याचे ते म्हणाले.

सत्यजीत रे यांचे काही चित्रपट आपण पाहिले असून भारतीय संगीताचाही आपल्यावर बराच परिणाम पडला आहे असेही त्यांनी सांगितले.


प्रवीण प्र. वाळिंबे
मीडिया को-ऑर्डिनेटर
९८२२४५४२३४ / ९४०५०३५४५८



Pune Marathon Bhavan, Near Mitra Mandal Colony, Opp. Parvati P. O.,
Pune - 411009, India. Tel: +91 20 24424545, Fax: +91 20 24428788,
Email: piff.india@gmail.com Website: www.puneinternationalfilmfestival.com
R. No. : F - 24914 / Pune S/R. No. : MAH / 1325 / 2009 / Pune


ORGANIZED BY Pune Film Foundation

JOINTLY WITH Government of Maharashtra